# गर्भाशयाचा दाह कारणे व उपाय

**डॉ. महेशकुमार इंगवले**
पशुजनन, मादीरोग व प्रसुतीशास्त्र विभाग
स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशु विज्ञान संस्था, अकोला.

बाह्य वातावरणातील रोग जंतू उघडया निरणातून गर्भाशयात प्रवेश करतात व वाढतात त्यामुळे गर्भाशयाला सुज येते यालाच गर्भाशयाचा दाह असे म्हणतात.

**कारणे :**

१. वार अडकणे.

२. वासरु अडल्यास ते सोडवितांना गर्भाशयास इजा झाल्यामुळे.

३. गर्भपात

४. गाईच्या पोटात वासरु मरुन सडणे.

५. अस्वच्छ जागा व अयोग्य व्यवस्थापनामुळे जंतुसंसर्ग.

६. विविध रोगांचा ताण व रोग प्रतीकारक शक्ती कमी झाल्यास.



**गर्भाशयाची सुज**

**लक्षणे :**

गर्भाशयाचा दाह हा दोन प्रकारचा असतो व त्याच्या तीव्रतेवरुन लक्षणे दिसतात.

**तीव्र गर्भाशयाचा दाह :**

योनीमार्गातून मोठया प्रमाणात घाण-पू येत राहतो. गर्भाशय सुजलेले असते. रोगजंतू रक्तातून शरीराच्या इतर भागात प्रवेश करतात व सर्व शरीर रोगी बनते.

- गाय कळा देते व अस्वस्थ होते.

- शरीराचे तापमान वाढून दुध उत्पादन घटते.

- गाय बसल्यावर पांढरट पू योनी मार्गाद्धारे बाहेर पडतो.

**सौम्य गर्भाशयाचा दाह :**

ह्या प्रकारात दाहाचे प्रमाण कमी असते व लक्षणे दिसुन येत नाहीत. गाय नियमीत माजावर येते पण गर्भधारणा होत नसल्यामुळे सतत उलटते. गाईचा माजात काचे सारखा चिकट स्त्रावाबरोबर पू बाहेर येतो. म्हणजे सोट हा पांढरा पू सारखा दिसतो. वरील दोन्ही प्रकारामध्ये गाईला पशुवैद्यक डॉक्टर कडून तपासणी करुन औषधोपचार करावा. निरोगी गर्भाशय झाल्यानंतर योग्य माजावर असल्यावर कृत्रीम रेतन करावे.